# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रसिद्धीपत्रक

## ❖ न्यायालयीन प्रक्रियेवरील प्रशिक्षण शिबिर संपन्न

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा भा प्र.से यांच्या निर्देशानुसार विधी विभागातर्फे महापालिकेतील वर्ग 1 ते 3 मधील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी "न्यायालयीन प्रक्रिया (Litigation Management)" या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन दि. 8 मे 2025 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगरभवन, (नगरभवन) येथे करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त डॉ.सचिन बांगर, उपायुक्त (मुख्यालय) श्रीम कल्पिता पिंपळे,मनपा विधी अधिकारी सई वडके, तसेच वर्ग 1 ते 3 चे सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबिरात कायद्यातील मूलभूत संकल्पना, न्यायालयीन प्रक्रिया, विविध प्रकारचे दावे, तक्रार दाखल करण्याची पद्धत, तसेच न्यायालयाचे आदेश पालिकेवर कशाप्रकारे बंधनकारक असतात याविषयी श्री. अभय जाधव ( विधी अधिकारी नवी मुंबई महानगर पालिका) यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. प्रशिक्षणादरम्यान अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मार्गदर्शकांशी संवाद साधत प्रत्यक्ष कामकाजात उपयुक्त ठरणाऱ्या विविध मुद्द्यांवर चर्चा केली.

या प्रशिक्षणाचा उद्देश प्रशासनात कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना न्यायालयीन प्रक्रिया व व्यवस्थापन याबाबत अधिक सखोल व व्यावहारिक ज्ञान प्राप्त करून देणे एवढाच आहे असे मा.आयुक्तांनी सांगितले. तसेच या उपक्रमात मार्गदर्शन करणाऱ्या विधी अधिकारी श्री. अभय जाधव यांचे मिरा भाईंदर महानगरपालिका तर्फे विशेष आभार मानत पुष्पगुच्छ व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानीत केले.